वर्धा, मंगळवार, ४ एप्रिल २०२३ सकाळ



वर्धा : मान्यवरांचा सत्कार करताना प्राध्यापक.

# आयपर येथे पालकसभा

वर्धा : विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित औषधी निर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव (मेघे) येथील महाविद्यालयात पालक सभेचे आयोजन करण्यात आले. सभेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले तसेच पालक प्रतिनिधी सुनील लोया व अर्चना चोपणे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ. ललित राठी यांनी केले तसेच उपस्थित पालक प्रतिनिधी अष्टपुत्रे व इतर पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ राजेंद्र गंजीवाले यांनी अध्यक्षीय भाषणातून पालक सभेचे मूळ उद्दिष्ट नमूद करून पालकांनी विचारलेल्या प्रश्नांचे समाधानकारक निरसन केले. तसेच महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहे असे सांगुन महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या हितार्थ राबविलेले सर्व कार्यक्रम व इतर सुविधा बाबत पालकांना अवगत केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. जयश्री वानखडे यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक साधना गौतम, गिरीश दहीकर व डॉ. निलेश करंडे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला महाविद्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सकाळ वर्धा, रविवार, ३० जुलै २०२३

# आयपरला मिळाले राष्ट्रीय नॅक मूल्यांकन

▸ सकाळ वृत्तसेवा

वर्धा, ता. २९ : विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित औषधीनिर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव (मेघे) या महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन व प्रमाणन परिषद (नॅक) बंगलोर ह्या राष्ट्रीय संस्थेतून ए प्लस + श्रेणी प्राप्त झालेली आहे. महाविद्यालयात राष्ट्रीय मूल्यांकन व प्रमाणन (नॅक) परिषदेने गठित केलेल्या त्री सदस्यीय नॅक पीअर टीमने प्रत्यक्ष भेट दिली.

या समितीचे हमदर्द विद्यापीठ नवी दिल्लीचे माजी कुलगुरू अध्यक्ष होते तसेच डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम विद्यापीठ कलकत्ता येथील समन्वय सदस्य तसेच उदयपूर राजस्थान येथील गीतांजली विद्यापीठाचे विभाग प्रमुख पीअर टिम मध्ये होते. महाविद्यालयाबद्दल प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले यांनी संपूर्ण माहिती दिली. तसेच डॉ. मनीषा पुराणिक नॅक समन्वयक व डॉ. दिलेश सिंघवी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक यांनी सादरीकरण केले.

आयपर महाविद्यालय हे ३२ वर्ष जुने महाविद्यालय असून महाविद्यालयात पहिले नॅक मूल्यांकण महाविद्यालयाचे माजी प्राचार्य मा. डॉ. प्र. गो. येवले असताना झाले होते.



**वर्धा : राष्ट्रीय मुल्यांकण प्रमाणपत्र देताना मान्यवर.**

महाविद्यालयाला मिळालेला दर्जा ही संस्थेसाठी भूषणावह बाब आहे असे सांगून मिळालेले यश सामूहिक प्रयत्नाचे फलित आहे असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले, नॅक समन्वयक डॉ. मनीषा पुराणिक, डॉ. दिनेश सिंघवी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक व विभाग प्रमुख डॉ. शगुफ्ता खान, डॉ. ललित राठी, डॉ. नीलेश करंडे, प्रा. गिरीश दहीकर, डॉ. देवराव आवारी, डॉ. बी. आर. गंधारे, प्रा. सुनील देवांनी, प्रा. अभिराम देशमुख, प्रा. साधना गौतम तसेच सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी नॅकच्या पर्व तयारीसाठी सहकार्य केले.

TheHitavada
NAGPUR ■ Saturday ■ August 5 ■ 2023

# IPER, Wardha receives 'A+' NAAC accreditation

■ District Correspondent
WARDHA, Aug 4

THE Institute Pharmaceutical Education and Research Institute Borgaon (Meghe) Wardha run by Vidarbha Youth Welfare Society Amravati has received 'A+' grade from National Assessment and Certification Council (NAAC) Bangalore, recently. A 3-member NAAC team visited the college recently.

The committee was chaired by former Vice-Chancellor of Hamdard University New Delhi, the member co-ordinator was from Dr APJ Abdul Kalam University, Calcutta, and Head of Department, Gitanjali University, Udaipur, Rajasthan was the member of the peer team. Firstly, the principal of the college Dr Rajendra Ganjiwale presented the information of the college and the development work done in the last 5 years and Dr Manisha Puranik NAAC Coordinator and Internal Quality Assurance Cell (IQAC) Coordinator Dr Dilesh Singhvi both gave presentions.

Throughout their visit, the team extensively examined every college department.

The committee checked and validated the report of the previous five years during the visit in order to verify the research work, publications, patents, and other educational, cultural, sports, and other programmes handled by the college's professors. During the visit, the peer team assessed the IQAC, visited the Placement Cell, Alumni Association, Departments and expressed satisfaction by appreciating the work of all the departments. IPER has been around for 32 years, and Dr PG Yeole oversaw the first NAAC evaluation.

All of the institute's fundamental physical, pedagogical, and operational infrastructure was created at that time, is still maintained today, and the administration of the institution is built on the same operational infrastructure. The NAAC Peer Team interacted with the principal, the head of the department, and the parents, alumni, and students present at the institute.

They made sure that the college is providing all the facilities for the students and voiced their approval. Students organised a cultural programme in the evening. The peer team specially praised the cultural programme and congratulated all the students for their wonderful performances.

In the exit meeting, the peer team discussed their observations with the college staff and presented the report to Dr Rajendra Ganjiwale. Dr Nitin Dhande, President of VYWS said that the achievement of the A+ status of the college is a matter of pride for the institution, and asserted that the achievement is the result of collective effort.

Dr Dhande, Vice President Adv Uday Deshmukh, Treasurer Prof Dr Hemant Deshmukh, Secretary Yuvraj Singh Chaudhary, Executive Member of the organisation Nitin Hiwase, Shankarao Kale, Dr Vaishali Dhande, Dr Poonama Chaudhary and Prof Ragini and Deshmukh appreciated and congratulated all the teaching and non-teaching staffers for getting the NAAC A+ grade.

Principal Dr Rajendra Ganjiwale, NAAC Coordinator Manisha Puranik, Dr Dilesh Singhvi Internal Quality Assurance Cell Coordinator and Head of Department Dr Shagufta Khan, Dr Lalit Rathi, Dr Nilesh Karande, Girish Dahikar, Dr Devrao Avari, Dr BR Gandhare, Sunil Devan, Abhiram Deshmukh, Sadhana Gautam and non-teaching staffers worked for the success.

The Hitavada
NAGPUR Friday October 6 2023

# IPER, Wardha celebrates World Pharmacists' Day



Glimpse of the programme.

District Correspondent
WARDHA, Oct 5

VIDARBHA Welfare Society's Institute of Pharmaceutical Education and Research, Borgaon Meghe, Wardha Celebrated World Pharmacists Day and organised a guest lecture under the theme 'Pharmacist Strengthening health system-Angdaan Mahadan' for M Pharm Students, recently.

Dr Rajendra Ganjiwale, Principal, Institute of Pharmaceutical Education and Research in his inaugural address, discussed the significance of World Pharmacist Day and the function of pharmacists in the healthcare Sector.

He also covered various scientific aspects of organ donation and its need.

"Organ donation saves lives of people," he said.

Dr Rupali Naik, Assistant Adminstrative Officer Co-ordinator, Acharya Vinoba Bhave Rural Hospital, Datta Meghe Institute of Higher Education and Reasearch, worked for success of the programme.

लोकमत
epaper.lokmat.com
रविवार, दि. ८ ऑक्टोबर २०२३

# आयपरमध्ये स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव



लोकमत न्यूज नेटवर्क

वर्धा : औषधीनिर्माण शाखा शिक्षण व संशोधन संस्था (आयपर) बोरगाव (मेघे) येथे रांगोळी पोस्टर, नृत्य वन मिनिट शो, आनंद मेळावा, आपपर गॉट टैलेंट, व्हॉलिबॉल, क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. बक्षीस वितरण कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले व आय.डी.पी.चे प्राचार्य डॉ. भूषणकुमार साठे, अंकित केडिया , डॉ. एस.ए. खान उपस्थित होते. प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले यांनी गणेश उत्सव हा राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे, असे सांगितले. विविध स्पर्धेतील विजेत्यांना गंजीवाले, साठे यांच्याहस्ते सन्मानित करण्यात आले. पर्यावरण पूरक गणपती निर्माल्य विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली होती. संचालन सिद्धांत बोरकर तर आभार प्रतीक झाडे यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्रा. एस. पी. देवानी, प्रा. ए. जे. देशमुख, , प्रा. आसोले, प्रा. एस. पी. गौतम व शिक्षकेतर कर्मचारी पी. बी. अनकर, व्ही. एम. दहियलकर, एस. एम. मोहिते, पी. पी. राऊत, एन. के. टापरे उपस्थित होते.

TheHitavada
Friday ■ November 3 ■ 2023

# IPER holds 2-day national conference on Nanotechnology



Guests and participants during the online conference.

■ District Correspondent
WARDHA, Nov 2

THE Pharmaceutics Department and IQAC of VYWS'S Institute of Pharmaceutical Education and Research, Wardha conducted APTI (MS) sponsored 2-day online conference on the theme 'Nanotechnology for Healthcare', recently.

Dr Shagufta Khan, Chief Co-ordinator of the conference, introduced the delegates about the conference and Dr R O Ganijiwale, Principal, IPER enlightened the delegates about the advancement in nanotechnology and about the informative sessions by the renowned scientists lined up during the 2 days.

Dr Zeenat Iqbal, Professor, School of Pharmaceutical Education and Research, New Delhi, was the keynote speaker for the conference. She delivered a captivating lecture on the title 'Transforming Women Reproductive Health: Nanoformulations and Intravaginal Drug Delivery Systems in Addressing Vaginal Afflictions and Overcoming Biofilm Challenges'.

She explained how women's health is ignored especially in the socioeconomically backward group and highlighted the challenges faced in treating vaginal infections.

She gave an in-depth elaboration on nanomedicine based vaginal delivery system in revolutionising vaginal drug delivery strategies. The second plenary lecture was delivered by Dr Sanyog Jain, Professor, National Institute of Pharmaceutical Education and Research Mohali.

He gave an insightful lecture on 'Design and Development of Nanotechnology Based Drug Delivery Strategies for Advanced Healthcare'.

On the second day a plenary lecture was delivered by Dr Nina Sharma, MD, Shamisha Resources Management Company, Mumbai.

She gave a motivating speech on 'Nanotechnology for Pharmaceutical Development of Nutrition Formulations: Opportunities and Challenges'.

The last plenary session was delivered by Dr Ashok Kumar Janakiraman, Professor Faculty of Pharmaceutical Sciences, UCSI University, Malaysia. He highlighted on 'Metallopolymer Nanoparticles in Cancer Therapy'. He explained how metallopolymer nanoparticles can do wonders in treating various types of cancers. Dr Shagufta Khan, Dr DileshSinghavi and Sunil Dewani conducted proceedings of the Scientific sessions. There was an overwhelming response for the conference from across the country. About 363 delegates including faculty, research scholars and students actively participated in the conference. The conference concluded with the views of the participants followed by a vote of thanks.

Participants expressed appreciation and wished to have such types of conferences on cutting edge research in the future. Abhiram Deshmukh proposed a vote of thanks, followed by the concluding remarks delievered by Dr Shagufta Khan, Co-ordinator and Dr R O Ganjiwale, Principal. Dr DileshSinghavi, Co-ordinator IQAC, Sunil Dewani, Abhiram Deshmukh, Dr Jayshree Hadke, Priyanka Sawarkar, Ashish Budhrani, Sameer Asole, and others worked for the success.

लोकमत
epaper.lokmat.com
रविवार, दि. १२ नोव्हेंबर २०२३

# आयपरचे पाच विद्यार्थी रा.तु.म. विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत






लोकमत न्यूज नेटवर्क

**वर्धा :** औषधनिर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव (मेघे) या महाविद्यालयाने उन्हाळी परीक्षेत यश संपादित केले. रा. तु. म. नागपूर विद्यापीठाद्वारे घेण्यात आलेल्या बी. फार्म व एम. फार्म उन्हाळी परीक्षेत औषधनिर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव (मेघे) वर्धा येथील विद्यार्थी विद्यापीठ गुणवत्ता यादीत आपले स्थान निश्चित केले. बी.फार्म या परीक्षेचा निकाल हाती लागला असून यात आयुषी पांडे हिने विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकाविला तर अपर्णा मिश्रा चौथा, संस्कृती सरोदे पाचव्या तर प्रफुल्ल रावल हा सहाव्या क्रमांकाचा मानकरी ठरला. त्याचप्रमाणे एम. फार्म परीक्षेतही महाविद्यालयाने यश संपादन केले. महाविद्यालयाची विद्यार्थिनी दर्शना बागवे ही एम. फार्म परीक्षेत विद्यापीठ गुणवत्ता यादीत दुसरी आली. गुणवत्ता प्राप्त सर्व विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष डॉ. नितीन धांडे, सचिव युवराजसिंग चौधरी, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे, डॉ. वैशाली धांडे, डॉ. पूनम चौधरी, डॉ. रागिनी देशमुख, प्राचार्य डॉ. आर. ओ. गंजीवाले तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

लोकमत
epaper.lokmat.com
गुरुवार, दि. ७ डिसेंबर २०२३

# आयपरमध्ये महापरिनिर्वाण दिन



वर्धा : स्थानिक औषधनिर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव (मेघे) या महाविद्यालयात भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. प्रसंगी कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र गंजीवाने यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन श्रद्धांजली देण्यात आली. ह्या प्रसंगी बोलताना प्राचार्य गंजीवाले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भारताच्या संविधानामध्ये केलेल्या योगदानाचा उल्लेख करुन त्यांच्या जीवनपटावर प्रकाश टाकला. महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित महाविद्यालय व नॅशनल डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया यांच्या मयुक्तः विद्यामाने आभासी प्रश्न मंजूषा आयोजित करण्यात आली. त्यामध्ये, महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यावेळी महाविद्यालयातील जी. डी.दहीकर, डॉ. डी.जे. सिंघवी, प्रा.डी.एम.आवारी, प्रा. एस. पी.देवानी, प्रा. ए.जे. देशमुख, प्रा. ए. एम. केडिया, प्रा. श्री. आसोले, प्रा. एस. पी. गौतम व शिक्षकेतर कर्मचारी पी.व्ही.अनकर, व्ही. एम. दहिवलकर, एन. जे. सोनटक्के, एस. एम. मोहिते उपस्थित होते. संचालन व आभार एम. वाय घोगरे व ए. ए. कार्लेकर यांनी मानले.